मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

# अर्थदीप



मराठी अर्थशास्त्र परिषदेचे

४५ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन

दिनांक ५, ६ आणि ७ नोव्हेंबर २०२२

जे. ई. एस. कॉलेज, जालना








मुख्यसंपादक

प्रोफेसर दिलीप अर्जुने

Online on https://jesjalna.org/economics/index.html

# मराठी अर्थशास्त्र परिषदेचे ४५ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन
## दिनांक ५, ६ आणि ७ नोव्हेंबर २०२२

अर्थदिप स्मरनिका

प्रमुख संपादक
प्रोफेसर दिलीप सोपान अर्जुने

संपादक
प्रा. एम जी. हिंगे
प्रा. बी. डी. तोटरे
डॉ. बी. पी. वाघ

मुख्य मार्गदर्शक
प्रोफेसर आर. एस. सोळुंके

**आयोजक**
जालना एज्युकेशन सोसायटीचे,
आर. जी. बगडिया कला, एस.बी. लखोटिया वाणिज्य व आर. बेझंजी विज्ञान महाविद्यालय, जालना

ऋत प्रकाशन जालना

# अर्थद्विप स्मरनिका

मुख्य पृष्ठ: बाबू तोटरे

अक्षर जुळवणी : प्रा. एम जी. हिंगे

ISBN: 978-93-84663-34-6
ऋत प्रकाशन जालना

किंमत: ००

ऋत प्रकाशन जालना

# १५वा वित्त आयोग आणि केंद्र व राज्य वित्तीय संबंध

डॉ.सचिन भास्कर कुंभार
अर्थशास्त्र विभाग,
डॉ. अण्णासाहेब जी.डी.बेंडाळे
महिला महाविद्यालय, जळगाव
आजीव सभासद क्र. १५८३
भ्रमणध्वनी – ९५९५४३०७७४
डॉ.राजेन्द्रकुमार गव्हाळे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
गो.से.विज्ञान,कला आणि वाणिज्य महाविद्यालय,खामगाव

**प्रस्थावना -**

कोणत्याही देशाची घटनात्मक व्यवस्था एक तर एक संघ व्यवस्था असते किंवा संघराज्यात्मक व्यवस्था असते . एक संघ घटनात्मक व्यवस्थेमध्ये केंद्रीय पातळीवर केंद्र सरकार असते. केंद्र सरकार आर्थिक,सामाजिक आणि राजकीय निर्णय स्वतः घेते.देशाचे संरक्षण,अंतर्गत शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे,न्याय,शिक्षण, लोकांचे कल्याण या सोबतच वित्तीय निर्णय केंद्रीय स्थरावर घेतले जातात. या व्यवस्थेत घटक राज्ये असतात परंतु त्यांना कोणतीही स्वायत्तता नसते. या प्रकारची व्यवस्था ब्रिटन,फ्रान्स,जर्मनी,ऑस्टेलिया आणि आशिया खंडातील बहुतांश देशांमध्ये कार्यरत आहे. संघराज्यात्मक व्यवस्थेमध्ये दोन पातळीवर सरकार असते. केंद्रीय पातळीवर केंद्रसरकार आणि राज्य पातळीवर राज्य सरकार देशाचे संरक्षण,आंतरराष्ट्रीय व्यवहार आणि चलन व्यवस्था ही प्रमुख कार्ये केंद्र सरकारला करावी लागतात. या बरोबरच केंद्र आपल्या कार्याच्या कक्षा विस्तारू शकते. बाकी सर्व कामे राज्य सरकारला करावी लागतात. राज्य स्वायत्त असतात. केंद्र आणि राज्यांची कार्ये आणि वित्तीय अधिकारांचे विभाजन घटनात्मक तरतूदीनुसार केले जाते. या प्रकारची व्यवस्था अमेरिका,कॅनडा आणि भारत या देशात अस्तित्वात आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने संघराज्यात्मक व्यवस्थेचा स्वीकार केला. भारतात २८ घटक राज्ये आणि ८ केंद्र शासीत प्रदेशांचा एक संघ आहे. या संघावर केंद्राचे नियंत्रण आहे. राज्यांना स्वायत्तता आहे. २६ जानेवारी १९५० रोजी भारतीय घटनातयार करण्यात आली. घटनेतील कलम २६४ ते २९३ मध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकारांच्या कार्याचे आणि वित्तीय अधिकाराचे विभाजन केलेले आहे. सदर शोध निबंधात केंद्र आणि राज्य सरकारांच्या वित्तीय संबंधी अभ्यास केलेला आहे.

**उद्दिष्ट :** १) केंद्र आणि राज्य सरकारांच्या वित्तीय संबंधी अभ्यास करणे.

**गृहीतक :** १) केंद्र आणि राज्य सरकारांच्या वित्तीय संबंधांमध्ये तणावा असलेला दिसून येतो.

**संशोधन पद्धती :** या शोध निबंधासाठी संशोधकाने दुय्यम साधन सामग्रीचा वापर केलेला आहे.

**१५वा वित्त आयोग संबंधी माहिती -**

१५वा वित्त आयोगाची स्थापना २७ नोव्हेंबर २०१७ ला झाली याचा कार्यकाल २०२० ते २०२५ पर्यंत आहे, याचे अध्यक्ष नंदकिशोर शिंग असून सदस्य अजय नारायण झा आणि डॉ.अनुप सिंह,अंशकालीन सदस्य डॉ.अशोक लाहिरी आणि डॉ.रमेश चंद, सचिव श्री. अरविंद मेहता हे आहेत.

निव्वळ कर उत्पनापैकी राज्यांना वाटा -

**घटक आणि भर**

| घटक | भर |
|---|---|
| लोकसंख्या (२०११) | १५ % |
| राजकोषीय शिस्त | २.५ % |
| क्षेत्रफळ | १५ % |
| वन आणि पर्यावरणशास्त्र | १० % |
| लोकसंख्याशास्त्रीय कामगिरी | १२.५ % |
| राजकोषीय क्षमता किवा उत्पन अंतर | ४५ % |

सर्वाधिक रक्कम मिळाली राज्याला

| राज्य | किती % |
|---|---|
| १) उत्तर प्रदेश | १७.९३९% |
| २) बिहार | १०.०५८ % |
| ३) मध्य प्रदेश | ७.८५०% |
| ४) पश्चिम बंगला | ७.५२३ |
| ५) महाराष्ट्र | ६.३१७% |

सर्वात कमी रक्कम मिळाली राज्याला

| राज्य | किती % |
|---|---|
| १)गोवा | ०.३८६ % |
| २)सिक्कीम | ०.३८८ % |
| ३)मिझोरम | ०.५०० % |
| ४)नागालँड | ०.५६९ % |

**देशातील एकूण राज्यामध्ये कर महसुलाच वाटा** ४१ % आहे, **सर्वाधिक रक्कम** उत्तरप्रदेश **राज्याला मिळणार** आहे. **सर्वाधिक कमी रक्कम** गोवा **राज्याला मिळणार आहे.**

**केंद्र आणि राज्य सरकारांच्या वित्तीय संबंधांमध्ये तणाव –**

भारतीय राज्य घटनेत केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यात वित्तीय साधनांचे आणि कार्याचे विभाजन करण्यात आलेले आहे. घटनाकारांनी विभाजन करताना केंद्र आणि राज्यांमध्ये सलोख्याचे संबंध निर्माण होतील, संपूर्ण देश एकसंघ राहील याची खबरदारी घेतलेली आहे. असे असले तरी गेल्या पाच दशकामध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यात वित्तीय साधनांच्या विभाजनावरून अनेक तणाव आणि संघर्ष निर्माण झालेले आहेत.

१) **उत्पन्नाचे साधने आणि जबाबदारी या बाबत तणाव** :- राज्य घटनेतील कलम २६४ ते २९३ मध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकारची कार्ये आणि ती पार पाडण्यासाठी उत्पन्न साधने यांचे विभाजन केलेले आहे. या मध्ये तणावाचा मुद्दा असा की, केंद्र सरकारकडे संरक्षण,विदेश व्यवहार व व्यापार,विदेश चलन व्यवहार,चलन निर्मिती (रुपया व नाणी) रेल्वे,पोस्ट व तारखाते,महामार्ग,हवाई व जल वाहतूक,कायदे इ.जबाबदाऱ्या आहेत तर राज्य सरकारकडे कृषी व जलसिंचन, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता, अंतर्गत शांतता व सुव्यवस्था, शिक्षण व प्रशिक्षण, अंतर्गत रस्ते, जल वाहतूक आणि व्यापार या सारखी अनेक विकासात्मक कामे सोपविलेली आहेत. जबाबदाऱ्यांच्या विचार करता केंद्र सरकारपेक्षा राज्य सरकारांकडे अनेक विकासात्मक आणि कल्याणकारी जबाबदाऱ्या मोठ्या प्रमाणावर सोपविलेल्या सीमा आहेत. उत्पन्न साधनांचा जर आपण विचार केल्यास केंद्र सरकारला प्राप्ती कर, महामंडळ कर. शुल्क, संपत्ती व वारसा हक्क शुल्क,स्टँप ड्युटी या सारख्या प्रमुख करांपासून

प्रचंड प्रमाणावर उत्पन्न मिळते तर राज्य सरकारांना कृषी उत्पन्न कर,जमीन महसूल,घट पट्टी, विक्रीकर, मद्यार्क युक्त पदार्थोवरील उत्पादन शुल्क, मनोरंजन कर यासारख्या गौण उत्पन्न मिळवून देणाऱ्या करांपासून उत्पन्न मिळते.

मागील अनेक दशकात केंद्रीय कराचा आकार आणि आधार हा विस्तारलेला आहे. पण महामंडळ कर,सीमा शुल्क आणि उत्पादन शुल्क या प्रमुख राज्याच्या कराचा आधार आणि आकारात फारस बदल झाले नाहीत. केंद्र सरकार २०१४-१५ मध्ये ८२९३८३ कोटी रुपये महसूल मिळाला होता. तर २४ घटक राज्यांना त्यांच्या करापासून २०१३-१४ मध्ये ११०७९१६ कोटी रुपये उत्पन्न मिळाले. राज्यांना मिळणारे उत्पन्न आणि खर्च यांचा मेळ घालण्यासाठी केंद्रावर अवलबून राहावे लागते. यातूनच केंद्र आणि राज्य सरकारमध्ये तणाव निर्माण होत असतात.

**२) राज्य सरकारांचे केंद्र सरकारवरील वाढते अवलंबित्व** - राज्य सरकारांच्या जबाबदाऱ्या दिवसेंदिवस वाढत आहेत. परंतु त्या जबाबदाऱ्या पूर्ण करण्यामाठी अनेक मार्गापासून मिळणारे उत्पन्न कमी पडत असल्याने राज्यांचे केंद्रावरील अवलंबित्व दिवसेंदिवस वाढत आहे. १९८०-८५ या काळात केंद्र सरकारकडून राज्याना एकूण ५३३२० कोटी रुपये हस्तांतरीत झाले. १९९०-९५ या काळात ही रक्कम २४४२६० कोटी रुपयांपर्यंत वाढली. १९९०-९५ या काळात राज्यांचा एकूण खर्च ६१५४९६ कोटी रुपये झाला होता. एकूण खर्चात केंद्रीय हस्तांतरित उत्पन्नाचा वाटा ४०% होता. याचा अर्थ राज्य सरकारला ज एकूण उत्पन्न मिळते त्यातून राज्याचा फक्त ६०% च खर्च भागविला गेला. दहाव्या वित्त आयोगाच्या शिफारशी नुसार१९९५-२००० या काळात राज्यांकडे २२६६४० कोटी रुपये हस्तांतरीत करण्याची शिफारस होती. तर अकराव्या वित्त आयोगाने यात ४३४९०५ कोटी रुपये हस्तांतरणाची शिफारस केलेली आहे. १२व्या वित्त आयोगाने ७५५७५२ कोटी रूपये,१३व्या वित्त आयोगाने ३१८५८१ कोटी रुपये हस्तांतरणाची शिफारस केली होती. राज्यांचे केंद्रावरील अवलंबित्वामुळे केंद्र सरकारचे राज्य सरकाराच्या कारभारातील हस्तक्षेप वाढत आहे. या हस्तक्षेपातूनच केंद्र आणि राज्यांमध्ये तणाव निर्माण होत आहेत. राज्यांचे केंद्रावरील अवलंबित्वाबाबत केंद्र सरकार तक्रार करते की,राज्य सरकार त्याच्या उत्पन्न मार्गात वाढ करण्याचे प्रामाणिक प्रयत्न करीत नाही. प्राप्ती कराप्रमाणेच पन्यांनी कृषीवर प्राप्तीकर आकारला तर राज्याच्या महसुलात वाढ होऊ शकेल पण राज्य सरकार कृषीवर कर आकारत नाहीत. केंद्रात आणि राज्यात एकाच पक्षाचे सरकार असेल तर वित्तीय हस्तारणाबाब कच्या पक्षाचे सरकार आहे. त्यातही केंद्रातील सरकारला सहकार्य करणाऱ्या राज्यांना सरकारांमध्ये झुकते माप मिळते त्यात इतर राज्यांवर अन्याय होतो. यातूनच केंद्र आणि राज्य सरकारांना मध्ये तणाव निर्माण होतात.

**३) राज्यांच्या स्वायत्ततेबाबत** – राज्य घटनाकारांनी देशाला विघटन शक्तीपासून वाचविण्यासाठी हेतू पुरस्काररित्या घटक राज्यापेक्षा केंद्र सरकारला अधिक जास्त दिलेले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळात बरेच वर्ष केंद्रात आणि राज्यामध्ये पक्षाचे सरकार असल्याने केंद्र व राज्यामधील संबंध मजबूत झालेत. यात केंद्र सरकार अधिक प्रभावी झाले. पण १९७९ मध्ये पश्चिम बंगाल मधिल सरकारने केंद्र राज्य सरकार संबंधावर टिप्पणी केली. यात म्हटले की,भारतातील घटनेची रचना संघीय नसून एक संघ जास्त आहे. केंद्र सरकारला सर्वोच्च अधिकार दिलेले आहेत. त्यामुळे केंद्र सरकार राज्यांच्या कारभारामध्ये हस्तक्षेप जास्त करते. उदा. कायदे आणि न्याय व्यवस्था हा राज्यांचा अधिकार आहे. असे असले तरी केंद्रीय राखीव पोलीस, सीमा सुरक्षा दल, औद्योगिक सुरक्षा दल इत्यादीच्या माध्यमातून केंद्र सरकार राज्यांच्या सुरक्षा व्यवस्थेत हस्तक्षेप करते. यामुळे राज्यांची स्वायत्तता कमी होते. तसेच केंद्र सरकार आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये हस्तक्षेप करून राज्यांच्या अधिकारावर अतिक्रमण करते. त्यामुळे केंद्र सरकार व राज्य सरकारांमध्ये तणाव निर्माण होतात. असा तणाव उत्तर प्रदेशातील मायावती सरकार,तामिळनाडूतील जयललिता सरकार,बिहारमधील यादव सरकार आणि केंद्र सरकार यांच्यात गेल्या ५ वर्षात नेहमीच निर्माण झाले आहेत.

**४) उत्पन्न साधनातील लवचिकतेवरून तणाव –** राज्यघटनेतील तरतुदीनुसार केंद्र सरकारला जे कर बसविण्याचे अधिकार आहेत. त्या करांमध्ये लवचिकता जास्त आहे. उदा. प्राप्तीकरांचा दर उत्पन्न वाढीबरोबर वाढत जातो, उत्पादन शुल्क उत्पन्न उत्पादन प्रमाण वाढीबरोबर वाढ जाते. आयातीत घट करण्यासाठी सरकार सीमा शुल्क दर वाढवून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न मिळवू शकते. पण राज्यांना जे कर बसविण्याचे अधिकार आहेत ते बरेचसे अलवचिक आहेत. शेतसाऱ्यात फारशी वाढ करता येत नाही. मनोरंजनकरही फारसे वाढविता येत नाही. विक्री कराचे दर वाढविले तर उत्पादक व विक्रेते विरोध करतात. ग्राहक आपला उपभोग किंमत वाढीमुळे कमी करतात असे झाले तर विक्री कमी होऊन सरकारचा महसूल घटतो. यामुळे राज्यांच्या उत्पन्न वाढीवर मर्यादा येतात. राज्यांना उत्पन्न अपुरे पडू लागल्याने ते केंद्राकडे अनुदान,मदत आणि कर्ज मागणी करतात. यातूनच केंद्र व राज्यांमध्ये वाद निर्माण होतात.

**५) नियोजन मंडळाचे महत्त्व जास्त आणि वित्त आयोगाचे महत्त कमी -** घटनेतील २८० कलमानुसार राष्ट्रपती वित्त आयोगाची स्थापना करतात. वित्त आयोग विभाज्यकर आणि करेत्तर उत्पन्न विभाजनाबाबत सरकारला शिफारस करू शकते. थोडक्यात वित्त आयोग हा घटनात्मक आहे. पण १९५१ पासून भारतात पंचवार्षिक योजना राबविण्यात येत आहे. योजना तयार करण्यासाठी आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली. नियोजन मंडळ स्थापन करण्याविषयी व त्याच्या कार्याविषयी घटनेत कोणतीही तरतूद नाही. म्हणजेच नियोजन मंडळ हे घटनाबाह्य केंद्र आहे. उत्पन्न हस्तांतरण शिफारस करताना वित्त आयोग व नियोजन मंडळ यांच्यात वाद निर्माण होतात. आज भारतात एक तृतीयांश उत्पन्नाचे हस्तांतरण वित्त आयोगाच्या तर दोन तृतीयांश हस्तांतरण नियोजन मंडळाच्या शिफारशीनुसार केले जाते. याचा अर्थ नियोजन मंडळ या घटनाबाह्य केंद्राचे महत्त्व वाढले आणि वित्तीय आयोगाचे महत्त्व कमी झाले. नियोजन मंडळाने उत्पन्न हस्तांतरणाच्या संदर्भात सुरुवातीची बरीच वर्षे कोणतेही निकष तयार केले नाहीत. नियोजन मंडळावर केंद्र सरकारचे पूर्ण प्रभुत्व असल्याने केंद्र सरकार नियोजन मंडळामार्फत काही राज्यांना सापत्निकाची वागणूक देऊ लागले यातून केंद्र सरकार आणि राज्य सरकारांमध्ये तणाव निर्माण होऊ लागले आहेत.

**६) प्रादेशिक असमतोल -** वित्त आयोग आणि नियोजन आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यांकडे जे उत्पन्न हस्तांतरीत केले जाते त्यातून प्रादेशिक असमतोल कमी झाला नाही. या उलट यातून दरडोई उत्पन्नात असमानता वाढली . योजना आयोगाच्या शिफारशीनुसार योजनाबद्ध साहाय्यता ७० % कर्जरूपाने आणि ३० % अनुदान रूपाने दिली जाते . हे प्रमाण स्थिर आहे ही साहाय्यता देताना विकसित आणि अविकसित राज्ये असा भेदभाव केला जात नाही . व्यवहारात हे धोरण अविकसित राज्यांच्या विरुद्ध जाते. प्रत्यक्षात अविकसित राज्यांना त्यांच्या विकासासाठी अनुदान जास्त आणि कर्ज कमी असे प्रमाण असावे. पण असे न झाल्याने अविकसित राज्यांचा कर्जाचा भार वाढला त्यामुळे विकसित राज्यांच्या तुलनेत त्याचे दरडोई उत्पन्न कमी आहे . विकसित राज्ये विकासाच्या नावाखाली केंद्राकडून स्वत: जास्तीत जास्त हस्तांतरण करून घेतात . त्यातून ते पायाभूत सुविधा निर्माण करून आपल्या विकासाचा वेग वाढवितात त्यामुळे त्यांचे उत्पन्न वाढते आणि दरडोई उत्पन्नात वाढ होते . तसेच विकसित राज्ये आपली महसूली व वित्तीय तुट जादा अनुदान प्राप्त करण्यात यशस्वी ठरतात. या सर्वांतून जास्त दाखवून केंद्राकडून विकसित राज्ये आणि अविकसित राज्ये असा प्रादेशिक असमतोल निर्माण होत आहे . यातून विकसित राज्ये व अविकसित राज्ये यांच्यात तणाव वाढत आहेत.

अशा प्रकारे केंद्र सरकार आणि राज्य सरकार एकमेकांवर आरोप - प्रत्यारोप करतात त्यातूनच त्यांच्यात तणाव निर्माण होत होत असल्याचे दिसून येत आहे.

**निकर्ष :-**

१) **वित्त आयोग** एक स्वतंत्र अर्ध न्यायिक विशेषज्ञ संस्था आहे.

२) वित्त आयोग **स्थापने मागे उद्देश** हा केंद्र सरकार व राज्य सरकार वित्तीय सामंजस्य निर्माण करण्यासाठी आहे.

३) **वित्त आयोगाला** राजकोषीय संघराज्यवादाचे संतूलन चाक म्हणतात परंतु केंद्र आणि राज्य यात आर्थिक असंतुलन असल्याचे दिसून येते.

४) देशातील विविध राज्यात प्रादेशिक असमतोलता मोठ्या प्रमाणात दिसून येते.

५) राज्य सरकार जे कर लावतात त्या करांन मध्ये राज्य सरकार वाढ करण्यास तयार नाही, कारण राज्य सरकार राजकीय स्वार्थासाठी या अधिकाराचा वापर करीत नाही.

६) केंद्र सरकार राज्यांच्या कारभारामध्ये हस्तक्षेप जास्त प्रमाणात करताना आढळते.

७) केंद्र सरकार आर्थिक आणि राजकीय क्षेत्रांमध्ये हस्तक्षेप करून राज्यांच्या अधिकारावर अतिक्रमण करत असलेले दिसून येते.

८) पश्चिम बंगाल व इतर काही राज्यांनी स्वायत्ततेची मागणी केली आहे.

**संदर्भ :-**

१) https://azreview.org

२) https://finance.maharashtra.gov.in/

३) भारतीय अर्थव्यवस्था – प्रा.डॉ.एन.एल.चव्हाण, प्रशांत पब्लिकेशन जळगाव.